चाणक्य मंडळ परिवार




# MPSC

# प्रचलित घडामोडी

## *स्पेशल कोर्स (मराठी)*

Headlines: १ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबर २०१९

७ ऑक्टोबर २०१९

# हेडलाईन्स

## देशभरात प्लॅस्टिकबंदी लागू

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, एकदा वापरात येणाऱ्या प्लॅस्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या या आवाहनाला सर्वच स्तरांतून उत्तम प्रतिसाद मिळू लागला आहे.
- 2 ऑक्टोबरपासून देशभरात प्लॅस्टिकबंदी लागू करण्यात आली आहे.
- या संदर्भात सर्व राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांना मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत.
- प्लॅस्टिक बॅग, प्लॅस्टिक कटलरी आणि थर्माकोल पासून तयार होणारी कटलरी बंद करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.
- सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला पर्यावरण मंत्रालयाने काही मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या होत्या. यामध्ये सरकारी कार्यालये, खासगी आणि सार्वजनिक कार्यालयांमध्ये प्लॅस्टिकची फुले, बॅनर्स प्लॅस्टिकचे झेंडे, स्टेशनरी वस्तू आदी वस्तूंचा वापर न करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.
- पर्यावरण मंत्रालय लवकरच 'एकदा वापरात' येणाऱ्या प्लॅस्टिकची व्याख्या स्पष्ट करणार आहे.
- सध्या 24 राज्ये आणि 6 केंद्रशासित प्रदेशांमध्ये मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत.

**पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986**

- मानवी पर्यावरण या विषयावर संयुक्त राष्ट्राने स्टॉकहोम येथे जून 1972 मध्ये एक जागतिक परिषद आयोजित केली होती. मानवी पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा याकरिता योग्य पावले उचलण्यात यावीत असा निर्णय या परिषदेत घेण्यात आला.
- भारतामध्ये 1980 साली पर्यावरण विभागाची स्थापना करण्यात आली.
- 1985 साली विभागाचे मंत्रालय झाले आणि 'पर्यावरण आणि वन मंत्रालय' अस्तित्वात आले.
- भोपाळ गॅस दुर्घटनेनंतर 1986 साली 'पर्यावरण संरक्षण अधिनियम' तयार करण्यात आला.
- 23 मे 1986 रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर झाले.

## SBI ने ऑस्ट्रेलियात सुरू केली शाखा

- भारतीय स्टेट बँकेने (SBI - State Bank of India) मेलबर्नमध्ये आपली शाखा सुरू केली आहे. ऑस्ट्रेलियामध्ये शाखा उघडणारी SBI भारतातील पहिलीच बँक ठरली आहे.
- एका भव्य कार्यक्रमात व्हिक्टोरिया राज्यातील मेलबर्नमध्ये शाखेचा उद्घाटनसोहळा पार पडला.
- याआधी व्हिक्टोरियामध्ये सिप्ला, सायरेन्ट, एचसीएल, इन्फोसिस, रॅमको, टीसीएस, महिंद्र आणि झोमॅटो या भारतीय कंपन्या कार्यरत आहेत.

**SBI – State Bank of India**

- मुख्यालय – मुंबई.
- आधीचे नाव – 'इंपेरियल बँक'
- SBI कायदा – 8 मे 1955 रोजी संमत.
- SBI साठी समिती : ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखालील 'अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण समिती'
- 1 जुलै 1955 रोजी इंपेरियल बँकेचे नाव SBI केले.
- SBI 'सरकारी व्यापारी बँक' म्हणून गणली जाते. यात भारत सरकारचा 58.47% वाटा आहे.
- मोठी संपत्ती असलेल्या यादीत SBI जगात 52 व्या क्रमांकाची बँक.
- बँकांच्या संपत्तीची यादी Bloom-berg संस्था जाहीर करते.
- Fortune Global 500, 2017 या Fortune च्या सर्वश्रेष्ठ कंपन्यांच्या यादीत 500 सर्वश्रेष्ठ कंपन्यांत SBI 217व्या क्रमांकावर.

## राजस्थानमधील तीन रेल्वे स्थानके स्वच्छतेबाबत देशात सर्वोत्कृष्ट

- रेल्वेच्या स्वच्छता सर्वेक्षणात राजस्थानमधील तीन रेल्वे स्थानकांनी स्वच्छतेसाठी सर्वोत्कृष्ट पुरस्काराचा मान मिळवला. असे रेल्वेमंत्री पीयुष गोयल यांनी जाहीर

केले.
- उपनगरीय स्थानकांमध्ये हा मान मिळवणाऱ्या मुंबईतील 3 स्थानके आहेत.
- रेल्वेच्या देशभरातील 720 स्थानकांपैकी जयपूर, जोधपूर व दुर्गापुरा या तीन स्थानकांनी यादीच्या पहिल्या तीन क्रमांकावरील स्थान पटकावले.
- 109 उपनगरीय स्थानकांपैकी मुंबईतील अंधेरी, विरार व नायगाव ही 3 स्थानके पहिल्या तीन क्रमांकाची ठरली.
- रेल्वेचा विभागनिहाय विचार केला असता उत्तर पश्चिम रेल्वेने पहिला क्रमांक मिळवला आहे.
- त्यानंतर दक्षिण -पूर्व मध्य रेल्वे व पूर्व-मध्य रेल्वे यांचा अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक आहे.

## NEFT ची सेवा आता 24 तास उपलब्ध

- National Electronic Fund Transfer (NEFT) ही सेवा 4 ऑक्टोबर पासून 24 तासांसाठी उपलब्ध करण्यात आली.
- यापूर्वी ही सेवा फक्त बँकेच्या कामकाज वेळेतच उपलब्ध असे. तसेच NEFT ने केल्या जाणाऱ्या व्यवहारातील शुल्क ही काढून टाकण्यात आले. या सगळ्यांची अंमलबजावणी RBI ची मौद्रिक धोरण समिती करते.

**मौद्रिक धोरण समिती (MPC - Monetary Policy Committee)**

- बी.एन. श्रीकृष्ण यांच्या 'वित्तीय सेवा कायदा सुधारणा आयोगाने (FSLRC - Financial Sector Legislative Reforms Commission) मार्च 2014 मध्ये चलनविषयक धोरण ठरविण्यासाठी मौद्रिक धोरण समिती (MPC) ची स्थापना करण्याची शिफारस केली होती.
- या आधी वाय. व्ही. रेड्डी समिती (2002) तारापोर समिती (2007), मिस्त्री समिती (2009), रघुराम राजन समिती यांनीही अशा प्रकारची समिती असावी अशी शिफारस केली.
- 2014 मध्ये ऊर्जित पटेल समितीनेही अशी शिफारस केली त्यासाठी त्यांनी उदाहरणार्थ म्हणून USA ची Federal Open Market Committee आणि इंग्लंडची Monitary Policy Committee चा उल्लेख केला.
- 2016-17 मध्ये RBI Act 1934 मध्ये दुरुस्ती करून मौद्रिक धोरण समितीची रचना स्पष्ट करण्यात आली.
- ही तरतूद 27 जून 2016 पासून लागू करण्यात आली.

**रचना**

- 6 सदस्य
- त्यातील 3 पदसिद्ध सदस्य RBI चे, 3 सदस्य सरकार नियुक्त करते.
- RBI च्या तीन सदस्यांत RBI चे गव्हर्नर, डेप्युटी गव्हर्नर व एक RBI तील अधिकारी असतो.
- अध्यक्ष : RBI गव्हर्नर

**कार्यप्रणाली**

- या समितीच्या वर्षातून किमान 4 बैठका झाल्या पाहिजेत.
- बैठकीस किमान 4 सदस्य उपस्थित (गणपूर्ती).
- गव्हर्नर किंवा डेप्युटी गव्हर्नर उपस्थित पाहिजेच.
- सर्व ठराव बहुमताने संमत केले जातात.
- या समितीचा निर्णय RBI वर बंधनकारक असतो.

**कार्य**

- चलनवाढ नियंत्रित करण्यासाठी चलनविषयक धोरण ठरविणे हे प्रमुख कार्य
- धोरण दर ठरविणे.
- धोरण दर ठरविण्याची जबाबदारी या समितीकडे असली तरी राबविण्याची जबाबदारी RBI वर आहे.

**NEFT काय आहे?**

- देणी भागविण्यासाठी ही यंत्रणा RBI ने नोव्हेंबर 2005 मध्ये सुरू केली.
- या यंत्रणेत देणी ताबडतोब न भागवता विशिष्ट वेळेत भागवतात.
- याने किमान (एकावेळी) किती पर्यंतची देणी देता येतात याची मर्यादा नाही. कमाल मर्यादा बँक ठरवतील.

## RBI आणि रेपो दर

**चर्चेत काय? :**

- नुकताच RBI ने रेपो दर कमी करून तो 5.15% वर आणला.

**रेपो दर (Repo Rate) म्हणजे काय?**

- जेव्हा बँका RBI ला शासकीय प्रतिभूती विकून कर्ज घेतात आणि ते परत विकत घेण्याचेही आश्वासन देतात (Repurchase Obligations - REPO) तेव्हा

त्याला रेपो व्यवहार म्हणतात.

- या व्यवहारावर RBI ज्या दराने व्याज आकारते त्याला रेपोदर म्हणतात.
- हा व्यवहार दोन टप्प्यांत पार पडतो.
  1) RBI बँकांना कर्ज देते.
  2) बँका RBI ला ते कर्ज परत करतात.
- या व्यवहाराचा कालावधी 1 ते 56 दिवस असू शकतो.
- यातील एका दिवसाच्या व्यवहाराला एकदिवसीय रेपो तर 2 ते 56 दिवसांच्या व्यवहाराला 'मुदत रेपो' म्हणतात.
- बोली पद्धतीने हा व्यवहार होतो. या व्यवहाराचा व्याजदर RBI मौद्रिक धोरण समिती ठरविते. या व्याजदराला स्थिर रेपोदर म्हणतात.
- प्रादेशिक ग्रामीण बँका वगळता सर्व अनुसूचित बँका रेपो व्यवहारात भाग घेऊ शकतात.

**रिव्हर्स रेपोदर (Reverse Repo Rate) :**

- या व्यवहारावर RBI बँकांना पुर्नखरेदीचे आश्वासन देऊन शासकीय प्रतिभूती विकून अल्पमुदतीचे कर्ज घेते. या व्यवहारात RBI ज्या दराने व्याज देते त्याला रिव्हर्स रेपो म्हणतात.
- हा व्यवहारही 1 ते 56 दिवसांच्या कालावधीत होतो.
- बँकांकडील अल्पकालीन अतिरिक्त तरलता वापरणे व ती उत्पादक ठरविणे हा या व्यवहारांमागचा RBI चा उद्देश असतो.
- रेपोदर व रिव्हर्स रेपोदर यांच्या दरातील अंतराला LAF Carridor म्हणतात. हा Carridor RBI ठरवते मौद्रिक धोरण समिती नाही.

## इक्वाडोर जानेवारी 2020 पर्यंत ओपेकामधून बाहेर पडणार

- अंतर्गत आर्थिक समस्यांचे कारण देऊन इक्वाडोरने 1 जानेवारी 2020 मध्ये ओपेक संघटनेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

**ओपेक (OPEC : The Organisation of Petroleum Exporting Countries) :**

- 14 सप्टेंबर 1960 मध्ये बगदाद (इराक) येथे स्थापन झालेली ही आंतरशासकीय संघटना आहे.
- इराण, इराक, कुवैत, सौदी अरेबिया व व्हेनेझुएला या पाच देशांनी मिळून स्थापना केली.
- 1965 पासून व्हिएन्ना (ऑस्ट्रीया) येथे ओपेकचे मुख्यालय आहे.
- सद्यस्थितीत एकूण 14 सदस्य : अल्जेरिया, अंगोला, काँगो, इक्वाडोर, इक्वेटोरिअल गिनी, गॅबोन, इराण, इराक, कुवैत, लिबीया, नायजेरिया, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, व्हेनेझुएला
- या संघटनेचा मुख्य उद्देश : जगातील तेल उद्योगाची निगा राखणे.

**इक्वाडोर –**

- दक्षिण अमेरिकेतील अँडिज पर्वताच्या पायथ्याशी असणारा एक छोटासा देश राजधानी – क्वीना
- उत्तरेस कोलंबिया, दक्षिणेस पेरू, पश्चिमेस प्रशांत महासागर आहेत.
- प्रसिद्ध गालापागोस बेटे इक्वाडोर देशात येतात.
- माऊंट काटोपौक्सी हे ज्वालामुखीय पर्वतसुद्धा इक्वाडोरमध्ये आहे.

## सुरजित भल्ला – आयएमएफ मध्ये भारतासाठीचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्त

- कॅबिनेट नियुक्ती समितीने 71 वर्षीय सुरजित भल्ला यांची IMF च्या भारतासाठीच्या कार्यकारी संचालक या पदी नियुक्ती केली.
- या अगोदर हे पद सुबीर गोकर्ण सांभाळत होते.
- सुरजित भल्ला हे प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आहेत.

**IMF आंतरराष्ट्रीय नाणे निधी**

- International Monetary Fund
- एकूण सदस्य 189
- स्थापना : 27 डिसेंबर 1945
- मुख्यालय : वॉशिंग्टन डीसी (USA)
- मुख्य अर्थतज्ज्ञ : गीता गोपीनाथ
- उद्देश : जागतिक आर्थिक प्रोत्साहन व आर्थिक स्थिरता प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे.
- 1944 मध्ये ब्रेटनवुड परिषदेत IMF ची स्थापना जागतिक बँकेसोबत झाली.

## ब्राह्मोस मिसाईल व क्षेपणास्त्र

- ब्राह्मोस सुपरसोनिक क्रुडल मिसाईलची यशस्वी चाचणी ओदिशाच्या चांदीपुर, इंटीग्रेटेड टेस्ट रेंज वरून घेण्यात आली.
- स्ट्राइक रेंज – 250 कि.मी.
- हे क्षेपणास्त्र जमिनीवरून, तसेच समुद्रावरून प्रक्षेपित

करता येऊ शकते.

- 11 मार्च 2017 रोजी ब्राह्मोस क्षेपणास्त्राची प्रथम यशस्वी चाचणी घेण्यात आली. ज्याची स्ट्राइक रेंज 450 कि.मी. होती.

## क्लीन वॉटर मिशन

- सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा मानांक निश्चित करण्यासाठी क्लीन वॉटर मिशन सुरू केले आहे.
- अटल इनोव्हेशन मिशन, नीति आयोग आणि युनिसेफ इंडियाने 'द गांधीयन चॅलेंज' सुरू केले आहे.
- द गांधीयन चॅलेंज शाळेतल्या मुलांसाठी सुरू केले आहे.
- भारतभरातील प्रत्येक मुलास गांधी तत्त्वांचा वापर करून शाश्वत भारतासाठी नवीन उपाय शोधण्यासाठी व्यासपीठ प्रयत्न करते.

**UNICEF : (United Nations Children's fund)**

- स्थापना : 11 डिसेंबर 1946
- मुख्यालय : न्यूयॉर्क
- UNICEF संयुक्त राष्ट्र संघाचा अविभाज्य भाग आहे.
- बाल हक्कांच्या माध्यमातून UNICEF ला मार्गदर्शन केले जाते.

## वायएसआर YSR वाहन मित्र योजना

- वरील योजना आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये सुरू केली आहे.
- आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांनी ही योजना सुरू केली आहे.
- योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दरवर्षी 10,000 रुपये भत्ता देण्यात येईल.
- 5 वर्षांत स्वयंरोजगार चालकांना 50,000 रुपये देण्यात येईल.

## परिचय उपक्रम

- आसाममध्ये NRC (National Register of Citizens) मधून वगळलेल्या लोकांच्या कायदेशीर मदतीसाठी विधी विद्यापीठांचा हा उपक्रम आहे.

**कशासाठी ?**

- आसाममधील लोकांसाठी NRC (राष्ट्रीय नागरिक नोंदणी) अंतिम यादी जाहीर झाली. या यादीतून वगळलेल्या व्यक्तींना कायदेशीर मदत देण्याकरिता भारतातील पाच विधी विद्यापीठांचा हा उपक्रम आहे.
- तसेच या उपक्रमांतर्गत NRC यादीतून वगळलेल्यांना कायदेशीर मदत देण्यासाठी वकील आणि कायदेशीर सेवा पुरविणाऱ्यांना देशभरातील स्वयंसेवक व सामाजिक संस्था प्रशिक्षण देण्यासाठी मदत करतील.

**खालील पाच विद्यापीठांच्या माध्यमांतून हा 'परिचय' राबवण्यात येईल.**

1) राष्ट्रीय विधी विद्यापीठ दिल्ली

2) राष्ट्रीय विधी विद्यापीठ – ओडीशा

3) नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी अँड ज्युडिशियल ॲकॅडमी – आसाम

4) नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ ज्युडिसियल सायन्स – कोलकाता

5) NALSAR युनिव्हर्सिटी ऑफ हैदराबाद

**महत्त्वाचे :**

- आसामची राजधानी–गुवाहाटी येथे परिचयचे मुख्यालय असेल. या अंतर्गत काही तज्ज्ञ व्यक्ती कायद्याच्या संबंधित प्रश्नांवर संशोधन करणार आहेत.
- आसाममधील NRC अंतिम यादी 31 ऑगस्ट 2019 ला घोषित झाली.यात 3,11,21004 व्यक्तींचा समावेश होता. तर 19,06,657 व्यक्तींना वगळण्यात आले होते.
- यादीतून आसाममधील त्या नागरिकांना वेगळे केले जाणार आहे. ज्यांनी 1971 सालानंतर बांगलादेशातून बेकायदेशीरपणे भारतात प्रवेश केला होता. मात्र यादीमध्ये नाव नसलेल्या नागरिकांना याचिका सादर करण्याची संधी दिली गेली.

**काय आहे NRC –**

- National Register Citizens

(राष्ट्रीय नागरिक नोंदणी) यात देशातील अधिकृत नागरिकांची नोंद असते.

- ज्यांचे नाव NRC मध्ये नाही त्यांना अवैध मानले जाते.
- NRC नुसार 25 मार्च 1971 पूर्वी आसाममध्ये राहणाऱ्या नागरिकांना भारतीय मानले जाते.
- NRC ही भारतीय नागरिकांच्या नावाची एक नोंदणी यादी आहे जी सन 1951 साली तयार करण्यात आली होती.

## शालेय शिक्षण गुणवत्ता निर्देशांक

- नीति आयोग, मनुष्यबळ विकास मंत्रालय आणि जागतिक बँक यांच्या प्रयत्नातून 'दि सक्सेस ऑफ अवर स्कूल-स्कूल एज्युकेशन क्वालिटी इंडेक्स (SEQI) या शीर्षकाखाली अहवाल तयार केला गेला. त्यात 'शालेय शिक्षण गुणवत्ता निदेशांक' प्रसिद्ध केला गेला.

**अहवालानुसार :**

1) केरळ अव्वल क्रमांकावर तर उत्तर प्रदेश शेवटच्या क्रमांकावर आहे.

2) महाराष्ट्राची तिसऱ्यावरून सहाव्या क्रमांकावर घसरण झाली.

**अहवालासाठी :**

1) मोठ्या राज्यांचा एक, छोट्या राज्यांचा एक व केंद्रशासित प्रदेशांचा एक असे तीन गट केले जाते.

2) पायाभूत वर्ष - 2015-16

3) अहवालानुसार - चंदीगढ अव्वल स्थानावर आहे.

4) शैक्षणिक गुणवत्ता निर्देशांकात महाराष्ट्राची घसरण झाली असली तरी 'शिक्षणाची संधी प्रदान' करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र प्रगतीपथावर आहे.

**महत्त्वाची आकडेवारी – (2011 नुसार)** नुसार राज्यांचा उतरता क्रम

1) केरळ - 94%

2) मिझोराम - 91.30%

3) गोवा - 88.70%

**सर्वांत कमी साक्षरता असलेली राज्ये**

1) बिहार - 61.80%

2) अरुणाचल प्रदेश - 65%

3) राजस्थान - 66%

## बिपिन रावत : 'चीफ ऑफ स्टाफ कमिटी' चे अध्यक्ष

- भारतीय लष्करप्रमुख जनरल बिपिन रावत यांनी 'चीफ ऑफ स्टाफ कमिटी' (COSC) या विभागाच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला.
- म्हणजे या अंतर्गत तिन्ही सैन्यदलांमध्ये समन्वय ठेवण्यासाठी एक संरक्षण प्रमख 'चीफ ऑफ डीफेन्स स्टाफ' नियुक्त करण्यात आले.
- देशाच्या हवाई, पायदळ, नौदल, तटरक्षक, सीमा पोलीस दल अशा सर्व सुरक्षा दलांमध्ये समन्वय राखण्याचे कार्य या पदामार्फत केले जाईल.
- बिपिन रावत : NDA मधून प्रशिक्षण पूर्ण करून 1978 मध्ये सैन्यात दाखल.

## दिनविशेष

- 1 ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय कॉफी दिन तसेच आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन
- 1 ऑक्टोबर 1837 - भारतातील पहिले टपाल कार्यालय सुरू.
- 1 ऑक्टोबर 1958 या वर्षापासून भारतात हवामान पद्धत वापरण्यास सुरुवात झाली.